नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे | Year - 2nd | अंक - २२३ | Issue - 223 | वार सोमवार दि. ३० डिसेंबर २०२४ | Blow- Monday Date 30 December 2024 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## संतोष देशमुख हत्येप्रकरणी तपासाची चक्री फिरली, सीआयडीकडून तपास सुरु

### संध्या सोनावणे यांच्यासह अन्य तीन जणांची सीआयडीकडून चौकशी सुरु

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

बीड : बीडमधील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणी तपासाची चक्र वेगवान फिरु लागली आहेत. याप्रकरणी आतापर्यंत वाल्मिक कराडांच्या पत्नी मंजिली कराड, कराडांचे २ बॉडीगार्ड, अजित पवार गटाच्या बीड जिल्हाध्यक्षांची सीआयडीने चौकशी केली आहे. तर मंजली कराड यांची आज पुन्हा चौकशी करण्यात आली. यामध्ये आता राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या युवती प्रदेशाध्यक्ष संध्या सोनावणे यांची देखील चौकशी करण्यात आली आहे. बीड शहर पोलिस ठाण्यात सीआयडीकडून त्यांची चौकशी करण्यात आली.

संध्या सोनावणे यांच्यासह अन्य तीन जणांची सीआयडीकडून चौकशी सुरु आहे. रविवारी आठ तासांपेक्षा अधिक काळ चौकशी करण्यात आली आहे. चौकशीनंतर संध्या सोनावणेंनी माध्यमांशी संवाद साधला आहे. यावेळी त्या म्हणाल्या की, राजकारणात असल्याने सर्वांशी संबंध येत असतात. पण वरिष्ठांवर होत असलेल्या आरोपांबाबत मी आता भाष्य करणार नाही. तर 'जेव्हा जेव्हा पोलीस प्रशासन बोलवेल त्यावेळी मी चौकशीला हजर राहणार असल्याचेही त्या म्हणाल्या आहेत.



सोनावणे पुढे म्हणाल्या की, पोलिसांनी जे जे विचारलं त्याची माहिती मी चौकशीत दिली आहे. मी पक्षामध्ये काम करत असल्यामुळे मला तपासासाठी बोलावलं होतं. बारा वाजता मी चौकशीसाठी आले होते. राजकारणात असल्यामुळे सर्वांचे संबंध येत असतात. वरिष्ठ नेत्यांवर जी आरोप होत आहेत त्याविषयी मी आता काही बोलणार नाही. मी पहिल्यांदा अशा चौकशीला सामोरं गेली आहे.

तत्पूर्वी संतोष देशमुख हत्याकांडात वाल्मिक कराड यांच्यावर संशयाची सुई आहे. त्यांच्यावर बीड पोलिसांनी खंडणीचा गुन्हा दाखल केला असून कराड सध्या फरार आहेत. याप्रकरणाचा तपास सीआयडीकडे सोपवण्यात आला असून सीआयडीचे वरिष्ठ अधिकारी जिल्ह्यात तळ ठोकून आहेत. खंडणी प्रकरणी सीआयडीने वाल्मिक कराड यांच्या पत्नीसह त्यांच्या २ बॉडीगार्डची चौकशी केली. तर आज पुन्हा मंजली कराड यांना चौकशीसाठी बोलावण्यात आले होते. तर यामध्ये राष्ट्रवादी अजित पवार गटाचे जिल्हाध्यक्ष आणि युवती प्रदेशाध्यक्षांचीही चौकशी करण्यात आल्याने आता अजित दादांचे टेन्शन वाढण्याची शक्यता आहे.

## अभिनेत्री प्राजक्ता माळीने घेतली देवेंद्र फडणवीसांची भेट; मुख्यमंत्र्यांनी दिला कारवाईचा इशारा!



**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

मुंबई : बीडच्या मस्साज-ोगमधील सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणावरून राजकीय वर्तुळात सध्या आरोप-प्रत्यारोप होत आहेत. या दरम्यान भाजपा आमदार सुरेश धस यांनी अभिनेत्री प्राजक्ता माळी हिचे नाव घेत केलेल्या वक्तव्याचीही चर्चा आहे. या पार्श्वभूमीवर अभिनेत्री प्राजक्ता माळी-ने मुंबईत पत्रकार परिषद घेत आपली भूमिका स्पष्ट केली. तसंच, धस यांनी केलेल्या वक्तव्याचा समाचारही घेतला. आपपासांतील राजकारणासाठी महिला कलाकारांच्या नावाचा गैरवापर होता कामा नये, अशा शब्दांत भूमिका स्पष्ट करणाऱ्या प्राजक्ताने धस यांनी आपली जाहीर माफी मागावी, अशी मागणी केली आहे. संतोष देशमुख हत्या प्रकरणावरून सुरू असलेल्या वादंगादरम्यान आमदार सुरेश धस यांनी हिंदी चित्रपटसृष्टीतील अभिनेत्रींसह माळीचेही नाव घेत टिप्पणी केली होती. दरम्यान, आज तिने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन तक्रारीचे निवेदन सादर केले.

मुख्यमंत्री कार्यालयामार्फत ही माहिती देण्यात आली. एक्स खात्यावरून फोटो पोस्ट करून म्हटलंय की, अभिनेत्री प्राजक्ता माळी यांनी आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची सागर निवासस्थानी भेट घेतली आणि निवेदन दिले. त्यांच्या सन्मानाला बाधा येईल, असे कुठलेही कृत्य खपवून घेणार नाही आणि त्यावर कारवाई केली जाईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांना आश्वस्त केले. त्यांच्याविरोधात यूट्यूबवर काही लोक आक्षेपार्ह व्हिडिओ प्रसारित करतात, अशीही तक्रार त्यांनी यावेळी केली. त्या सर्वांवर सुद्धा कारवाई करण्याचे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांना दिले. कलाकार म्हणून वेगवेगळ्या शहरांत जाणं, प्रेक्षकांचं मनोरंजन करणं हे कलाकारांचं काम आहे. परळीच नाही, महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात जाऊन मी काम केलं आहे. यापुढेही काम करत राहणार. याआधीही अनेक राजकीय नेत्यांबरोबर, मान्यवरांबरोबर फोटो आहेत. मग त्या फोटोचा संदर्भ घेऊन तुम्ही कुणाहीबरोबर असंच नाव जोडणार का? हे एक महिला कलाकार म्हणून मला अतिशय निंदनीय वाटतं. महाराष्ट्रातल्या राजकारण्यांना हे कृत्य शोभत नाही. ते बोलले ते इतकं कुत्सित आहे. तुम्ही फक्त महिला कलाकारांच्या चारित्र्यावर शिंतोडे उडवत नाही आ-हात. महिलांच्या कर्तृत्वावरही प्रश्नचिन्ह उपस्थित करत आहात. कुठल्या राजकारण्यांच्या कुबड्यांशिवाय एखादी महिला स्वकर्तृत्वावर यशस्वी होऊ शकत नाही का? अशी टिप्पणी करून तुम्ही स्वत:ची मानसिकता दाखवत आहात, अशा शब्दांत प्राजक्ता माळीनं आपला संताप पत्रकार परिषदेत व्यक्त केला.

## 'महाकुंभ' हा एकतेचा संदेश : पंतप्रधान नरेंद्र मोदी



नवी दिल्ली : आगामी महाकुंभ 'एकतेचा महाकुंभ' असल्याचे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांच्या 'मन की बात'मध्ये केले. आगामी भव्य धार्मिक मेळाव्यातून समाजा-तील द्वेष आणि फूट संपवण्याचा संकल्प घेऊन परतण्याचे आवाहनही त्यांनी या वेळी केले. 'महाकुंभ का संदेश एक हो पुरा देश' (महाकुंभचा संदेश संपूर्ण देश एक झाला पाहिजे). 'गंगा की अविरल धारा, ना बनते समाज हमारा' (गंगेच्या अखंड प्रवाहाप्रमाणे आपला समाज एक राहू दे), असे पंतप्रधान म्हणाले. १३ जानेवारीपासून प्रयागराज येथे होणाऱ्या या विशाल मेळ्याला भेट देणाऱ्या लोकांच्या विविधतेवर भाष्य करताना विविधतेतील एकतेचे असे दुसरे उदाहरण नसल्याचे ते म्हणाले. महाकुंभचे आयोजन १२ वर्षांनी होत असते.

भारत पुढील वर्षी फेब्रुवारीमध्ये प्रथमच 'जागतिक ऑडिओ व्हिज्युअल एंटरटेनमेंट समिट' (वेव्हज) आयोजित करणार आहे. जे देशातील प्रतिभा, सहकार्यांना चालना देण्यासाठी आणि जागतिक दर्जाच्या सामग्री निर्मितीचे केंद्र म्हणून देशाची क्षमता दर्शविणारे जागतिक व्यासपीठ असेल, असे मोदी यांनी सांगितले. ५ ते ९ फेब्रुवारीदरम्यान होणाऱ्या शिखर परिषदेसाठी माध्यम आणि मनोरंजन उद्योगातील तसेच जगभरातील प्रतिभावंत दिल्लीत एकत्रित होणार आहेत. ही शिखर परिषद भारताला जागतिक मनोरंजन सामग्री निर्मितीचे केंद्र बनवण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल असल्याचे मोदी म्हणाले.

नववर्षारंभी प्रयागराजमध्ये होणाऱ्या महाकुंभसाठी उत्तर प्रदेश सरकारने अभूतपूर्व सुरक्षा व्यवस्था केली असून, त्याअंतर्गत पाण्याखाली १०० मीटर आणि जमिनीपासून १२० मीटर उंचीवर लक्ष ठेवण्यास सक्षम ड्रोन तैनात केले जाणार आहेत. महाकुंभ दरम्यान प्रथमच पाण्याखालील ड्रोन संगम परिसरात तैनात केले जाणार आहेत तर 'टेथर्ड ड्रोन' हवाई संरक्षण करतील. पाण्याखालील ड्रोन चोवीस तास कार्यरत राहणार असून कमी प्रकाशातही ते कार्य करण्यास सक्षम आहेत.

## तारापूर एमआयडीसीतील कंपनीत अग्नीतांडव, ३ कंपन्या आगीच्या भक्ष्यस्थानी

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

पालघर : तारापूर औद्योगिक क्षेत्रातील कंपनीला भीषण आग लागल्याची घटना घडली आहे. सालवड शिवाजी नगर परिसरातील कंपनीला लागली भीषण आग लागल्यानंतर परिसरात आगीचे आणि धुरा-चे लांबच लांब लोट दूरपर्यंत जात होते. आगीच्या घटनेनंतर तात्काळ अग्निशमन दल घटनास्थळी दाखल झालं असून आग विझवण्याचे शर्थीचे प्रयत्न सुरू आहेत.

तारापूर औद्योगिक क्षेत्रा-तील प्लॉट क्रमांक ७ मधील यु. के. रोमॅटिक या अगरबत्ती आणि अगरबत्तीला लागणाऱ्या केमिकल बनवणाऱ्या कंपनीला आग लागली. आज २९ डिसेंबर रोजी रविवारी या कंपनीला सुट्टी असल्यामुळे कारखान्यात सुर-क्षा कर्मचारी यांच्या व्यतिरिक्त कोणीही उपस्थित नव्हतं. परिसरातील कारखान्यांमधील काही कामगार, सुरक्षा रक्षकांना प्रशासनाने इतरत्र हलवलं. त्यामुळे मोठी जीवितहानी टळली, मात्र कंपन्यांचं लाखोंचं नुकसान झालं आहे. बोईसर तारापूर एमआयडीसीतील तीन कारखाने या आगीच्या भक्षस्थानी आले आहेत. युके रोमॅटिक्स, श्री केमिकल तसंच नंतर आदर्श टेक्स्टाईलला आग लागली. आग विझवण्याकरता तारा-पूर एमआयडीसीच्या अग्निशमन दलासह तारापूर अणुऊर्जा केंद्र, पालघर, डहाणू आणि विरार नगरपरिषदेच्या आणि डहाणूच्या अदानी पॉवर इत्यादी





ठिकाणाहून अग्निशमन दलाच्या गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या. अशा अग्निशमन दलाच्या पाच गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या. कारखान्यातील ज्वलनशील रसायनाचा स्फोट होऊन आग भडकत होती. तर जळतं रसायन गटारातून वाहत येत असल्याने आग रस्त्यापर्यंत पोहच-ली. आगीचे आणि धुराचे लोट दूरपर्यंत पसरले. घटनास्थळी पालघर जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक बाळास-ाहेब पाटील तहसीलदार रमेश शेंडगे यांच्यासह बोईसर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शिरीष पवार उपस्थित होते. सुरक्षितेच्या दृष्टीने उपाय म्हणून पोलीसांनी घटनास्थळाकडे जाणारे सर्व रस्ते बंद केले आहेत. बोईसर तारापूर एमआयडीसीतील कारखान्यांमध्ये आगीच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याने कामगारांसह स्थानिकांमध्येही भीतीचं वाता-वरण आहे.

**अल्पकालीन शेगाव दौऱ्यावर**

**गजानन महाराजांच्या समाधीस्थळी नतमस्तक**

## धीरेंद्र शास्त्री गजानन महाराजांच्या चरणी

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

बुलढाणा : शिर्डीच्या साईबाबांबाबत वादग्रस्त वक्तव्य करणारे बागेश्वर धाम पीठाधीश्वर धीरेंद्र कृष्ण शास्त्री आज रविवारी विदर्भ पंढरी शेगाव नगरीत दाखल झाले. संत नगरी शेगाव येथील गजानन महाराज संस्थानला भेट देऊन ते गजानन महाराजांच्या समाधीस्थळी नतमस्तक झाले. आपल्या प्रवचन, समस्या पूर्ती कार्यक्रम, यामुळे देशभरात प्रसिद्ध आणि अधूनमधून वादग्रस्त विधानांमुळे चर्चेत असण-ारे धीरेंद्र कृष्ण शास्त्री उत्तर महाराष्ट्रातील जळगाव खान्देश येथे आयोजित धार्मिक कार्यक्रमासाठी दौऱ्यावर आले होते. आज रविवारी ते अल्पकालीन दौऱ्यावर शेगा-वात पोहोचले होते.

मध्य प्रदेशातील छतरपूर जिल्ह्या-तील गडा गावात असलेले 'बागेश्वर धाम' हे स्वयंभू हनुमानजींसाठी देश-विदेशात प्रसिद्ध आहे. बागेश्वर धाम ही अनेक तपस्वींची दैवी भूमी आहे, जिथे नुसते दर्शन घेऊन लोकांना बाल-ाजी महाराजांचे आशीर्वाद मिळतात. येथे बालाजी महाराज एका अर्जाद्वारे तुमची समस्या ऐकतात आणि धामचे पीठाधीश्वर धीरेंद्र कृष्ण शास्त्री, ज्यांना जग बागेश्वर धाम सरकार या नावाने संबोधते, त्यांच्यामार्फत ते समस्यांचे समाधान मिळवतात.

हेच धीरेंद्र कृष्ण शास्त्री आज संतश्रेष्ठ गजानन महाराजांच्या चरणी लिन होण्यासाठी संत नगरीत दाखल झाले होते. शेगाव येथे संत गजानन महाराजांचे दर्शन घेतले. केवळ एका तासापुरता त्यांचा हा दर्शन दौरा होता. यावेळी त्यांनी श्री संत गजानन महाराजांचे दर्शन घेऊन संस्थानच्या पदाधिकाऱ्यांशी चर्चा करीत गजानन महाराज संस्थानतर्फे शेगाव आणि अन्य शाखांतर्फे वर्षभर राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती घेतली. शेगाव भेटीमागे धीरेंद्र कृष्ण शास्त्री यांचा हाच उद्देश होता, असे



यावेळी सांगण्यात आले. मात्र या भेटीचा फारसा गाजावाजा करण्याचे आणि प्रसिद्धी करण्याचे टाळण्यात आले. पूर्व नियोजित वेळेपेक्षा उशिराने त्यांचे हेलिकॉप्टरने शेगाव परिसरात आगमन झाले.

जळगाव खांदेशच्या विमानतळावरून ते हेलिकॉप्टरने शेगावमध्ये पोहचले. माऊली अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या परिसरामध्ये हेलीपॅड तयार करण्यात आले होते. खराब हवामानामुळे त्यांना शेगावात दाखल होण्यास विलंब लागला. यावेळी संत गजानन महाराज संस्थानकडून त्यांचे स्वागत सत्कार करण्यात आले. गर्दी लक्षात घेता जिल्हा पोलीस प्रशासनाने दौरा स्थळ मार्गावर तगडा पो-लीस बंदोबस्त तैनात केला होता. दर्शनानंतर त्यांनी पुन्हा हेलिकॉप्टरने जळगावकडे प्रयाण केले. धीरेंद्र शास्त्री यांनी जबलपूरमध्ये श्री साईबाबा यांच्याबाबत वादग्रस्त वक्तव्य केले होते. आपल्या धर्माच्या शंकराचार्य यांनी साईबाबांना देवाचे स्थान दिलेले नाही आणि शंकराचार्य यांचे म्हणणे समजून घेणे हे आपले आद्यकर्तव्य आहे. साईबाबा संत असू शकतात, फकीर असू शकतात, पण देव असू शकत नाहीत. कोल्ह्याची कातडी पांघरून कोणी सिंह होऊ शकत नाही, देव देव आहेत, संत संत आहेत. त्यामुळे साई हे देव नाहीत, हे शंकराचार्य यांचे विधान प्रमाण असल्याचे धीरेंद्र शास्त्री म्हणाले होते. त्यांच्या या वक्तव्यामुळे साई भक्तांनी संताप व्यक्त केला होता. साईबाबा आमचे दैवत आहे, अशी प्रतिक्रिया साई भक्तांनी दिली होती.

## मागील भांडणाचा राग मनात धरून तरुणाचा खून; दोघांना अटक

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

सोलापूर (प्रतिनिधी) मागील भांडणाचा राग मनात धरून २८ डिसेंबर रोजी रात्री साडेदहा वाजण्याच्या सुमारास शेळगी येथे राहणाऱ्या एका २० वर्षीय तरुणाचा कपाळावर,डोक्यात,डोळ्यावर लोखंडी स्टीलच्या स्टॅन्डने वार करून खून करण्यात आल्याची घटना उघडकीस आली आहे.युवराज प्रभूलिंग स्वामी (वय-२०,रा.शिवगंगा नगर, शेळगी) असे त्या तरुणाचे नाव आहे.

या घटनेची हकीकत अशी की,शेळगी येथे येथील शिवगंगा नगर येथे राहणाऱ्या युवराज प्रभूलिंग स्वामी व संशयित आरोपी विजय उर्फ सोनू बनसोडे आणि सुजल मरबे (दोघे.रा.दहिटणे) यांच्यात मैत्री होती.युवराज स्वामी हा रिक्षा चालक असल्याचे समजते.त्यांच्यात यापूर्वी भांडण झाले होते.घटनेच्या दिवशी या भांडणाचा राग मनात धरून २८ नोव्हेंबर रोजी रात्री साडेदहा वाजण्याच्या सुमारास वाजता सुमारास विजय बनसोडे व सुजल मरबे या दोघांनी युवराज यास मोटरसायकलवर बसवुन रात्री नऊच्या सुमारास शेळगी दहिटणे रस्त्यावरील निर्मल डेव्हलपर्सच्या प्लॉटिंग होत असलेल्या मोकळ्या जागेत नेऊन युवराज स्वामी यास मारहाण केली.त्याच्या कपाळावर,डोळ्यावर,डोक्यावर गंभीर स्वरूपाचे वार केले.

ही घटना जोडभावी पेठ पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक,सहाय्यक पोलीस निरीक्षक यांना कळताच संपूर्ण पोलीस पथक त्या ठिकाणी पोहचले.गंभीर बेशुद्ध अवस्थेत त्या तरुणास उपचाराकरिता शासकीय रुग्णालयात दाखल केले होते.परंतु उपचारापूर्वीच त्याचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले.

याबाबत त्याचा भाऊ नागेश प्रभुलिंग स्वामी (वय-१८) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात विजय बनसोडे व सुजल मरबे या दोघांनी माझ्या भावाचा खून केल्याची फिर्याद जोडभावी पेठ पो-लीस ठाण्यात दिला आहे.दरम्यान जोडभावी पेठ पोलीस ठाण्याच्या पथकाने रातो-रात कौशल्यपूर्ण तपास करून दोघा संशयित आरोपींना ताब्यात घेतले आहे.पुढील तपास मदुपोनि.शेख या करीत आहेत.

दैनिक
# यश सिद्धि न्यूज

सोमवार दि. ३० डिसेंबर २०२४ 

## संपादकीय....


### तपासाचा वेग वाढला

बीडमधील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणी तपासाची चक्र वेगवान फिरु लागली आहेत. याप्रकरणी आतापर्यंत वाल्मिक कराडांच्या पत्नी मंजिली कराड, कराडांचे २ बॉडीगार्ड, अजित पवार गटाच्या बीड जिल्हाध्यक्षांची सीआयडीने चौकशी केली आहे. तर मंजली कराड यांची आज पुन्हा चौकशी करण्यात आली. यामध्ये आता राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या युवती प्रदेशाध्यक्ष संध्या सोनावणे यांची देखील चौकशी करण्यात आली आहे. बीड शहर पोलिस ठाण्यात सीआयडीकडून त्यांची चौकशी करण्यात आली. संध्या सोनावणे यांच्यासह अन्य तीन जणांची सीआयडीकडून चौकशी सुरु आहे. रविवारी आठ तासांपेक्षा अधिक काळ चौकशी करण्यात आली आहे. चौकशीनंतर संध्या सोनावणेंनी माध्यमांशी संवाद साधला आहे. यावेळी त्या म्हणाल्या की, राजकारणात असल्याने सर्वांशी संबंध येत असतात. पण वरिष्ठांवर होत असलेल्या आरोपांबाबत मी आता भाष्य करणार नाही. तर 'जेव्हा जेव्हा पोलीस प्रशासन बोलवेल त्यावेळी मी चौकशीला हजर राहणार असल्याचेही त्या म्हणाल्या आहेत. तत्पूर्वी संतोष देशमुख हत्याकांडात वाल्मिक कराड यांच्यावर संशयाची सुई आहे. त्यांच्यावर बीड पोलिसांनी खंडणीचा गुन्हा दाखल केला असून कराड सध्या फरार आहेत. याप्रकरणाचा तपास सीआयडीकडे सोपवण्यात आला असून सीआयडीचे वरिष्ठ अधिकारी जिल्ह्यात तळ ठोकून आहेत. खंडणी प्रकरणी सीआयडीने वाल्मिक कराड यांच्या पत्नीसह त्यांच्या २ बॉडीगार्डची चौकशी केली. तर आज पुन्हा मंजली कराड यांना चौकशीसाठी बोलावण्यात आले होते.

# मनाच्या मर्यादा आणि सुखाचा उंबरठा

काही वेळा जीवनात असे प्रसंग येतात जेव्हा मनाला असा भास होतो की सुख मनाच्या उंबरठयावर येऊन परत जातंय. खरं तर सुख म्हणजे काय हे जो पर्यंत कळतं नाही तो पर्यंत त्याचा आनंद कसा घ्यायचा हे ही कळतं नाही. माणूस भौतिक वस्तू मधून सुख प्राप्त करण्याचा प्रयत्न करतो जे त्याला कधीच मिळत नाही. सुख मिळवण्यासाठी अश्या वस्तू प्राप्त कराव्यात ज्यातून आत्मिक समाधान तर मिळेलच या व्यतिरिक्त एक परिपूर्ण जीवन जगण्याची वाट मिळेल.जीवन जगण्याच्या शर्यतीत प्रत्येक जण धावत आहे. प्रत्येकाची जीवनाला पाहण्याची दृष्टी वेगवेगळी असू शकते. कुणी भरमसाठ पैसा, उच्च राहणीमान आणि यातून मिळणारी प्रतिष्ठा याला सफल जीवन मानत असेल तर कुणी उदरनिर्वाह भागण्या पुरता पैसा, साधे राहणीमान आणि उच्च प्रतीची मानसिक अवस्था ज्या मनात सर्वांविषयी प्रेम असेल, नम्रभाव ठेवून जगाला आपलंस करण्याची ओढ आणि माणुसकीचे जिवंत उदाहरण म्हणून जीवन जगण्याची इच्छा असेल तोच सफल जीवन जगू शकतो. संतांनी कधीच धन वैभव याला संपत्ती म्हणून संबोधले नाही तर मानवता, परोपकार, सद्गुण आणि सद्विचार यांना जीवनाची खरी संपत्ती म्हणून पहिले आणि आपल्या उपदेशातुन जगाला सांगितले आहे. हा अमूल्य ठेवा ज्याच्या ठायी असेल तोच खऱ्या अर्थाने सुखी आहे असे म्हणता येईल. घर, परिवार, नाते आणि मित्र हे जपण्यासाठी खूप खर्च नसतो फक्त प्रेम आणि विश्वास हे यांना सतत जिवंत ठेवतात तसेच हे ज्यांच्या कडे भरभरून आहे ते कधीच खचून जात नाहीत.

जगात वावरताना काही अशी अवलिया माणसे भेटतात ज्यांना कसलीही परिस्थिती डगमगवू शकत नाही.जीवन जगत असताना आपल्या ज्या प्राथमिकता ठरवून दिलेल्या आहेत अन्न, वस्त्र आणि निवारा ह्या आहेत परंतु या सोबतच सद्य परिस्थितीत यात सद्विचार आणि सद्गुण हे ही जोडण्याची गरज असल्याचे जाणवते. केवळ अन्न, वस्त्र आणि निवारा असल्याने माणूस परिपूर्ण होत नाही. अन्न केवळ पोट भरण्याच काम करत परंतु संत उपदेश संकुचित मनाची पोकळी भरण्याचे काम करतात. केवळ अंगभर वस्त्र असल्याने माणूस सुंदर दिसत नाही तर मनी प्रेमभाव आणि नम्रता असेल तरच माणूस खऱ्या अर्थाने माणूस म्हणून शोभून दिसतो. केवळ डोक्यावर छत असलं म्हणजे निवारा आहे असे म्हणता येणार नाही ज्याच्या डोक्यावर सदैव वडीलधाऱ्या मंडळीचे शुभ आशीर्वाद आणि संताचा हात असेल त्याच्या ठायी खरा निवारा आहे आणि त्याच वास्तू मध्ये परमसुख निनादत असते.सुखाचा लोभ आणि दुःखाचा शिन ज्याला विचलित करू शकत नाही तोच खरा समाधानी म्हणता येईल. अनेक वेळा आपणच आपल्या विचारांना आणि मानसिक अवस्थेला एक मर्यादा लावून देतो. सुखी होण्यासाठी आपण अमर्याद प्रयत्न करत राहतो परंतु सतत पडलेला चेहरा, भविष्याचा विचार करून चिंतित राहणे आणि ज्या गोष्टी आपल्या हातात नाहीत त्या बदलण्याचा निरर्थक अट्टाहास करत राहणे यातून मिळते केवळ नैराश्य आणि अश्या नैराश्याला कसलीच मर्यादा नसते. कधी कधी असे नैराश्य माणसाला जीवन संपवायला भाग पाडतात. सकारात्मक विचारसरणी समृध्द करून जीवन जगण्यात जो आनंद आहे त्याला तोड नाही. जीवनात पावलो पावली संघर्ष आहे. विजेता आणि पराजित क्षणाक्षणाला बदलत राहतात.काही कमावल्याचा थोडा आनंद आणि गमावल्याच अफाट दुःख झोळीत भरून आपला जीवन प्रवास निरंतर सुरूच राहतो.जशी एखादी गुणगुण करणारी माशी उच्च प्रतीचे मिष्ठान्न सोडून जखमे भोवती घुमत राहते त्या प्रमाणे माणूस हा प्राणी सुद्धा असीम सुखाचे साधन सोडून असाध्य इच्छा आणि आकांक्षा पूर्ण करण्याच्या प्रयत्नात आयुष्यभर झुरत राहतो. भगवान बुद्ध म्हणतात इच्छा ह्याच दुःखाचं मुळ कारण आहे. बरं माणसाची कुवत असेलही इच्छा साध्य करण्याची पण त्यालाही काही मर्यादा असतातच ना. प्रत्येक पूर्ण झालेली इच्छा ही नव्या इच्छेला जन्म देते आणि हा उन सावलीचा खेळ आयुष्यभर संपत नाही. जे प्राप्त आहे त्याचा आनंद घेण्या ऐवजी माणूस नसलेल्या वस्तूंच्या दुःखाने तीळतीळ मरत जातो. असा जगतो जसा कधी जन्मलाच नाही आणि असा मरतो जसा कधी जगलाच नाही.



असामान्य माणसे कधीच नकारात्मक भूमिका घेऊन जगत नाहीत कारण त्यांना एकाच अप्राप्त गोष्टीला धरून बसण्याची सवय नसते.ते रोज नवी आव्हाने झेलत आपले जीवन व्यतीत करत राहतात.आपण जर थोडा प्रयत्न केला तर एक समाधानी जीवन जगण्याची संधी रोज मिळते गरज आहे फक्त आपणच लावलेल्या संकुचित विचाराच्या मर्यादा लांघुन उज्वल भवितव्याचा विचार करण्याचा. अमर्यादित आनंद घेण्यासाठी अमर्यादित प्रयत्नही करावे लागतील.विशाल सागराच्या लाटा कितीही वेगाने धावून आल्या तरी किनाऱ्यावर येऊन माघारी फिरतात तसच मनाचा मोह कितीही वाढला तरीही त्याला एक मर्यादा लावून दिली की त्याला अहंकार होणार नाही.

शेवटी सांगण्याचा उद्देश एवढाच की आपण लावलेल्या मर्यादा आपणच मोडू शकतो मग त्या समाधानी राहण्यासाठी मोडायच्या की दुःखी होण्यासाठी ते ही आपणच ठरवावं कारण आपल्या जीवनाची दिशा जेंव्हा आपणच ठरवतो तेंव्हा अगदी छोट्यातल्या छोट्या गोष्टीतून आपण अमर्यादित आनंद प्राप्त करू शकतो. प्रेमातून कमावलेली माणसे हीच खरी संपत्ती असते. मनाच्या मर्यादा जेव्हा इतरांच्या सुखासाठी मोडल्या जातात तेंव्हा आपल्या जीवनात येणारे सुख हे केवळ उंबरठयावर येऊन थांबत नाही तर मनाच्या परसात येऊन लोटांगण घालेल हे नक्की.

**पवन श्रीरंगसा कुसुंदल,नांदेड**
**संपर्क:- ९०७५५९५६९५**

# स्वयंसेवी संघटना जबाबदाऱ्या झिडकारत आहेत काय?

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

भूमिपुत्र वाघ : बीड जिल्ह्यातील सरपंच संतोष देशमुख यांची हत्या होते.चर्चा होते.निषेध मोर्चे निघतात.ठीक ठिकाणी निषेध व्यक्त केले जातात. हे सर्व होत असताना अमानुषपणे केलेली हत्या याच्या संदर्भात एकाही स्वयंसेवी संघटनेने सहभाग निंदविला नाही. कोणीही मत व्यक्त केलं नाही. कोणीही निषेध केला नाही..

बीड जिल्ह्यातील ही अशी एकच घटना नाही. अशा अनेक घटनांसोबत स्त्री भ्रूण हत्या,महिलांची गर्भाशय काढून टाकणे, असे अनेक प्रकार होताना दिसत आहेत. अशा विविध मानवी मूल्य पायदळी तुडवणाऱ्या घटना घडत असताना पुरोगामी महाराष्ट्रातल्या स्वयंसेवी संस्था गप्प का? इतकी मरगळ स्वयंसेवी क्षेत्रात कशी आली.अशा अनेक घटना महाराष्ट्रामध्ये नियमित घडत असतांना स्वयंसेवी संघटनांचा आवाज कुठेही उठलेला दिसत नाही.अशा हातबल झालेल्या स्वयंसेवी संघटना त्यांचा आवाज कुठे दबला गेला?कुठे मारला गेला? नेमकी अशी अवस्था का झाली. हा चिंतनाचा विषय मात्र नक्कीच समाजासमोर येतो आहे. माणूस तिथून सारखाच. तो कोणत्या जातीचा आहे? धर्माचा आहे?हा विषय इथे घेन्या सारखा नाहीचय.लोकशाहीला काळीमा फासणाऱ्या कोणत्याही घटना कुठल्याही व्यक्ती सोबत अथवा समुहासोबत होऊ द्यात.त्याचा निषेध व्यक्त करणे,कायदेशीर कार्यवाही करायला सरकारला भाग पाडणे,याची जबाबदारी स्वयंसेवी संस्था घेत होत्या. समाजाचा आत्मविश्वास बरोबर घेऊन सरकारवर दबाव गट म्हणून सामाजिक संघटना कार्य करत होत्या.आणि सत्तेत असलेले कोणतेही सरकार स्वयंसेवी संस्थांच्या आवाजाची दखल घेत होते.पोलीस प्रशासन स्वयंसेवी संस्थांच्या आवाजाला प्रतिसाद देत होते.ती आदरयुक्त भीती पोलीस प्रशासनामध्ये होतीच.

परंतु सध्या सर्वच वारे उलटे फिरताना दिसते आहे. अशा महत्त्वाच्या जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी आता स्वयंसेवी संस्थांचा पुढाकार दिसत नाही.त्या जबाबदारी पासून दूर गेल्याचे दिसते आहे. स्वयंसेवी क्षेत्रात अशी मरगळ का आली?अशा महत्त्वाच्या कारणांचा अभ्यास करणे अत्यंत गरजेचे वाटायला लागले आहे.स्वयंसेवी संघटन दुबळ झालं आहे का?नेतृत्व हरल्यासारखे दिसत आहे का?महाराष्ट्रामध्ये तेवढ्या ताकतीचे नेतृत्व आता उरलेले दिसत नाही का?आर्थिक बळ देणाऱ्या मदत करणाऱ्या संस्था आणि लोक उरलेले नाहीत का?अशा घटनेच्या पाठीमागे जात,धर्म आणि राजकारण जोडले जात आहे का? म्हणून कदाचित स्वयंसेवी संस्था त्रयस्ताच्या भूमिकेत उभा राहतांना दिसत आहेत का? मित्रांनो भविष्यातील भीतीचा विचार केला असता,लोकशाहीतिल मानवी मूल्य घेऊन कार्य करणारा गट जेंव्हा अस्थिर होईल, त्रयस्त होईल.तेव्हा येथील धर्मसत्ता आणि राज्यसत्ता माजल्यासारखं वागेल.लगाम सुटलेल्या घोड्यासारखं उधळायला लागेल. अशा माजलेल्या राजशक्तीला लगाम घालण्यासाठी मानवी मूल्य घेऊन समाजासमोर उभा राहणे स्वयंसेवी संघटनांचं काम होतं.ते पुन्हा वाढविण्याची आवश्यकता वाटते. सामाजिक बदलाचे कार्य,सामाजिक परिवर्तनाचे कार्य,आणि समाजावर,समूहावर कोणी अन्याय अत्याचार करत असेल त्यावरती जन अंकुश निर्माण करण्याचे कार्य हे स्वयंसेवी संघटना करत होत्या ते पुढेही वाढवण्याची अत्यंत आवश्यकता आहे असे वाटते.सामाजिक विकासाचे काम करणारे लोक या देशात असणे अत्यंत गरजेचे आहे. नाऊमेद होऊन चालणार नाही.त्यासाठी पुन्हा माणसांचं समूहाचे बळ, संघटन,संस्थांची एकजूट होणे अत्यंत गरजेचे आहे. नाहीतर भविष्य काळामध्ये लोकशाही मूल्य पायदळी तुडवली जातील.माणसांचे जीवन अस्थिर होईल. अल्पसंख्यांक दलित भटक्यांसाठी कोणी काम करणार नाही.आणि पुन्हा सर्वसामान्यांचे शोषण होईल.त्यासाठी स्वयंसेवी संस्थांनी सजग राहणे, संघटित राहणे,आणि राज्यसत्तेवरती अंकुश निर्माण करण्याची गरज आहे असे वाटते.



# नांदुर्डी जनता विद्यालयाचे ५२ वे विज्ञान प्रदर्शनात विद्यार्थ्यांचे यश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
निफाड/प्रतिनिधी

पंचायत समिती निफाड (शिक्षण विभाग ) व कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय,विंचूर आणि तालुका विज्ञान अध्यापक संघ निफाड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित निफाड तालुकास्तरीय ५२वे विज्ञान प्रदर्शनात जनता विद्यालय नांदुर्डी चे सुयश.प्राप्त केले

कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय विंचूर येथे ५२ वे निफाड तालुका विज्ञान प्रदर्शन पार पडले त्यामध्ये जनता विद्यालय नांदुर्डी या विद्यालयातील एकूण सात उपकरणे सादर केली त्यापैकी पाचवी ते आठवी गट प्रतिकृती गटामध्ये विद्यालयातील विद्यार्थी सिद्धार्थ अरुण कोल्हे तसेच मुकेश शामराव जगताप या विद्यार्थ्यांनी स्मार्ट हेल्मेट हे उपकरण सादर केले त्यामध्ये त्यांना द्वितीय क्रमांक प्राप्त केला असून त्यांची जिल्हास्तरावर निवड झाली तसेच दिव्यांग गटामध्ये इयत्ता नववी ते बारावी गटांमध्ये कुमार शुभम केदु खैरे विद्यार्थ्याने ऑटोमॅटिक बेड अटॅच व्हील चेअर उपकरण म्हणून तृतीय क्रमांक प्राप्त केला . यावेळी खा. भास्करराव भगरे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना बक्षीस वितरण केले व पुढील जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या यशस्वी विद्यार्थ्यांना विद्यालयाचे विज्ञान शिक्षक रमेश पगारे शिंदे टी जी ,पवार व्ही के श्रीमती शोभा मोतीगे , आहेर प्रतिभा, घुमरे तसेच विद्यालयातील सर्व विज्ञान शिक्षक यांनी परिश्रम घेतले तसेच सदर विद्यार्थ्यांचे विद्यालयाचे मुख्याध्यापक डावरे डी ए व पर्यवेक्षक दाते आर पी सर्व स्कूल कमिटीचे अध्यक्ष बोराडे ,एकनाथ पा. निकम, तसेच सिताराम पा. ढोमसे व विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

# विज्ञान व तंत्रज्ञानाचे कौशल्य आत्मसात करावेत : प्रा. डॉ. नाफडे

## कल्याणशेट्टी महाविद्यालयात विज्ञान अभ्यास मंडळाचा शुभारंभ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
प्रतिनिधी/अक्कलकोट

विज्ञान आणि तंत्रज्ञानाने अभूतपूर्व प्रगती केली आहे. त्यामुळे जगाशी संपर्क करणे सोपे झाले आहे. विद्यार्थ्यांनी विज्ञानापासून बोध घेऊन विज्ञान व तंत्रज्ञान कौशल्य आत्मसात करावेत. असे प्रतिपादन पद्मभूषण बद्रीनाथ बारवाला महाविद्यालयातील सूक्ष्ममशास्त्र विभागप्रमुख प्रा डॉ भूषण नाफडे यांनी केले.

महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्थेचे मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयातील विज्ञान विद्याशाखा आयोजित विज्ञान अभ्यास मंडळाचा शुभारंभ करताना ते बोलत होते. अध्यक्षस्थानी मल्लिनाथ कल्याणशेट्टी होते. व्यासपीठावर प्राचार्य एम ए शेख, प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे, समन्वयक मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी उपस्थित होते.

पुढे ते म्हणाले की, विज्ञानाने उपग्रह तयार केले, त्यामुळे चंद्रापर्यंत मानवाने सफर केली, तंत्रज्ञानाच्या माध्यमातून मोबाईलची निर्मिती झाली मोबाईल मधून व्हाट्सअप गुगल फेसबुक ट्विटर मेसेज आदि सुविधा प्राप्त झाल्या, ही प्रगतीची वाटचाल अभ्यास संशोधन करण्यासाठी विद्यार्थ्यांना अधिक उपयुक्त आहे.




मल्लिनाथकल्याणशेट्टीम्हणाले की, विद्यार्थ्यांवर शिक्षकांचा प्रभाव पडतो विज्ञान अभ्यास मंडळातून उद्बोधक उपक्रम होणे आवश्यक आहे. विज्ञानाने लावलेले शोध तंत्रज्ञानाने केले प्रगतीचा विद्यार्थ्यांनी आढावा घेतला पाहिजे. शिक्षकांनी त्यांना सहकार्य केले पाहिजे.

प्रारंभी गणितज्ञ रामानुजाचार्य यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विज्ञान अभ्यास मंडळाचा शुभारंभ करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ एस आर लोखंडे यांनी केले. सूत्रसंचलन प्राध्यापिका हर्षदा गायकवाड यांनी केले तर आभार प्राध्यापक राजशेखर पवार यांनी मानले.

## विद्यार्थ्यांचे भवितव्य अंधारात

### शिक्षणाच्या पवित्र दरबारात ''मला वेड लावलय लावलयया गाण्यावर गुरूजींनी धरतय ठेका?

# शिक्षण क्षेत्रात सेवा बजावणारे आधुनिक शिक्षकांना रिल्सचे वेड !

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
विश्वनाथ चव्हाण/अक्कलकोट

डिजिटल युगात तरुण पिढीला रील्सचे वेड लागले असुन.रील बनवण्याच्या नादात कितीतरी जणांनी आपल्या प्राणास मुकावले असले तरी देखील रिल्स चे व्यसन कमी न होता वाढतच आहे.अशातच एक रिल्स चा व्हिडियो व्हायरल होत आहे.आधुनिक शिक्षकांना रिल्सचे वेड लागले असुन जिल्हा परिषद मराठी शाळेतील एका गुरूजींनी विद्यार्थिनींसोबतमला वेड लावलय लावलय लावलय या गाण्यावर ठेका धरला . हा व्हिडिओ पाहून पालक संतप्त झाले आहेत.

अक्कलकोट तालुक्याच्या शिक्षण क्षेत्रात अनेक मातब्बर गुरूजी रिल बनवण्यात सक्रिय असुन शिक्षण क्षेत्रात सेवा बजावण्याची नुसती कागदोपत्री हजेरी दाखवले जाते.यावर कुणी अपेक्ष घेणे तर सोडा पण बोलत देखिल नाही अशी ओरड नित्याचीच आहे.यांचे ताजा उदाहरण असताना जिल्हा परिषद शाळेतील गुरुजींना राजकारणापेक्षा रिल बनवण्याचे वेड लागले आहेत.एका शाळेतील शिक्षकांनी मुलींसोबतमला वेड लावलय लावलय लावलयमला वेड लावलय लावलय लावलय या गाण्यावर चांगलाच ठेका धरलेला व्हिडिओ सर्वत्र व्हायरल झाला आहे.शैक्षणिक क्षेत्रासारख्या पवित्र ठिकाणी व शिक्षणाच्या दरबारात रिल चे धिंगाणा घालणे ही लाजिरवाणी बाब असुन? पालकाना ते खटकत आहे.

शिक्षण क्षेत्रात कार्यरत पण इतर राजकीय पुढाऱ्याशी जवळीक असणारे गुरूजी आम्हाला कोण विचारणार?आमच्याविरुद्ध कोण तक्रार करणार?आमचे हात लांबपर्यंत असल्याने आमचे कोण काय करणार?या भ्रमात निढविलेले गुरुजीं रिल बनविण्यात पुढे असल्याचे दिसते.सरस्वतीच्या या पवित्र दरबारात देखील गुरूजी रिल'च्या क्षेत्रात सक्रीय आहेत,ही दुर्दैवाची बाब असुन अक्कलकोट तालुक्यातील काही जि.प शाळेतील गुरूजी रिल बनविण्याचे स्वप्न, मानापमानाचे नाट्य चांगलेच रंगुन घेत आहेत.त्यांना शाळेबाबतची तळमळ नव्हे तर रिल चे मळमळ अधोरेखित झाली असल्याची भावना पालक वर्गातुन व्यक्त होत आहे.

शिक्षकांवर सकारात्मक नियंत्रण रहावे या हेतूने शिक्षण समितीची रचना राज्यशासनाने अंमलात आणली आहे.परंतु वर्गातील काही गुरूजी सोशल क्षेत्रात उडी घेत शिक्षणाचा बोजवाराच उडवत आहेत. नाममात्र अध्यापनाच्या कामासोबत रिल बनवण्यात सहभागी असणारे शिक्षक निदर्शनास येत आहे.

शैक्षणिक कामाकडे दुर्लक्ष करून रिल बनवण्यात धन्यता मानणार्या व सक्रिय असलेल्या गुरूजी यांच्यावर आता तरी शिक्षण विभाग कारवाईचा निर्णय घेणार का?शैक्षणिक काम करणार्या शिक्षकावर शिक्षण विभागाचा काहीच धाक राहिला नाही.

गुरूजी यांना रिलचे काम करण्यापासून रोखण्याचा निर्णय घेण्यात येणार का? त्या अनुषंगाने शालेय शिक्षण विभाग तसा प्रस्ताव तयार करणार का?रिल करण्यात,स्वतःला धन्य समजतात.याची गंभीर दखल शासन घेणार आहे का?याचा सरळ परिणाम शैक्षणिक गुणवत्तेवर मोठ्या प्रमाणात झाला आहे.आणि अद्यापी होत आहे.यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाल्याचे शासनाच्या निर्दशनात आणुन देणार कोण?काही गुरूजी प्रशासन आमच काय वाकडे करणार?आमच्या पाठिशी नेतेमंडळी असल्याची मग्रुरीची भाषा वापरताना दिसुन येतात. शाळेमध्ये शिकविण्याचे काम करण्यापेक्षा काही गुरूजी रिल बनवण्यास रस घेतात.या प्रकारांना चाप बसावा या अर्थाने गुरूजी यांना रिल बनवण्यावर बंदी केली जाणार का?त्यासंदर्भातील शिक्षण विभाग आदेश काढणार का? हा कळीचा मुद्दा आहे.

धांगडधिंगा घालणाऱ्या शिक्षकांवर कठोर कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे..तसेच शाळांवर नियंत्रण ठेवणे गरजेचे आहे. ज्यांच्याकडून विदयार्थी घडवण्याची अपेक्षा आहे. त्यांच्याकडूनच विदयार्थ्यांना बिघड़वण्याचे काम सुरू आहे.गुरूजी शाळेत असे वागत असतील तर विद्याथ्यावर ते काय संस्कार करणार असा सवाल उपस्थित होत आहे

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

दैनिक
# यश सिद्धि न्यूज



## थोडक्यात...

### धमकी देऊन आर्थिक फसवणूक; एकावर गुन्हा

सोलापूर, (प्रतिनिधी) : धमकी देऊन आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी एका जनाविरुद्ध फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना दि.३१ जुलै २०२४ ते ६ ऑगस्ट २०२४ दरम्यान घडली.




याप्रकरणी प्रतिश राजू शिंदे (वय-३०,रा. अलंकापुरी नगर लक्ष्मी पेठ यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून सुकेशनी नागनाथ लोंढे (रा. गंगानगर,देगाव रोड) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की,वेळोवेळी वरील संशयित आरोपी यांनी टू बीएचके खोली लमसम घराला भाडे नाही पैशाला व्याज नाही या पद्धतीने पाच लाख रुपये भाड्याने देण्यास करारपत्र करून त्यापैकी साडेतीन लाख रुपये घेऊन खोलीचा ताबा पाहिजे असेल तर आणखीन तीन लाख रुपये द्या.नाहीतर दिलेले पैसे विसरा असे म्हणून फिर्यादी यांना धमकी देऊन आर्थिक फसवणूक केली आहे. असे फिर्यादीत नमूद आहे.पुढील तपास महिला सहाय्यक पोलीस निरीक्षक मोरे पाटील या करीत आहेत.

# श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याच्या वतीने आमदार अभिजीत पाटील यांचा सन्मान

## माढा मतदारसंघातून मोठ्या मताधिक्याने विजय संपादन केल्याबद्दल सत्कार सोहळा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर तालुका वेनूनगर गुरसाळे येथील श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन, आमदार अभिजीत (आबा) पाटील साहेब यांनी माढा मतदारसंघातून मोठ्या मताधिक्याने विजय संपादन केल्याबद्दल श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याच्या वतीने२९/१२/२०२४ रोजी सत्कार सोहळा संपन्न झाला.



सदर प्रसंगी सत्काराला उत्तर देताना अभिजीत आबा पाटील म्हणाले की, बायो सीएनजी प्रकल्पाच्या भूमिपूजन प्रसंगी देशाचे नेते शरदचंद्रजी पवार म्हणाले होते की, चेअरमन अभिताभ पाटील हे लोकांनी तयार केलेली नेतृत्व आहे. त्यास आम्ही संधी देऊ, श्री विठ्ठल कारखान्याच्या पुनर्जीवन मिळावी हे कारखान्याच्या पंचवार्षिक निवडणूक मध्ये भाग घे- तेवेळी कोणताही अनुभव पाठीशी नव्हता नवनवीन सवंगडे जोडून हे संपादन करून कारखाना यशस्वीरित्य चालवल्यामुळे जनसामान्याचा विश्वास संपादन करता आला. त्यामुळे सर्वांनी सर्व जबाबदारी स्वीकारून दिवसाचे रात्रीचा दिवस करून काम केल्यामुळे अवघ्या तीन महिन्यांमध्ये प्रस्थापितांचा विरोध करून प्रचंड बहुमताने विजय मिळवता आला. त्यामुळे हिवाळी अधिवेशनामध्ये ५५ विषयावर आवाज उठवून विषय मांडण्यात आली विषय मांडून बऱ्याच वर्षापासून प्रलंबित असलेले प्रश्न मार्गी लावण्यासाठी मुख्यत्वे करून उजनी धरणातील ॲग्रो टुरिझम प्रकल्प व मेंढापूर येथील एमआयडीसीचा प्रकल्प व माढा भागातील पिण्याचा पाण्याचा प्रश्न असे अनेक प्रश्न मार्गी लावण्यासाठी हिवाळी अधिवेशनामध्ये त्याचा आवाज उठवण्यात आला आहे.

लोकांची सेवा करण्यात यावी म्हणून आरोग्य समितीवर सदस्य म्हणून निवड करण्यात यावी अशी मागणी केली होती माझी त्या समितीवर निवड ही करण्यात आली आहे. असे सर्वसामान्य जनतेला त्याचा फायदा व्हावा यासाठी सौर ऊर्जा प्रकल्प सोलर ऊर्जा पंप त्याचा शेतकऱ्यांना फायदा व्हावा यासाठी पंचायत समिती जिल्हा परिषद मार्फत लोक कल्याणकारी योजनेचा भाग घ्यावा व या योजनेमध्ये निधी कमी पडू दिला जाणार नाही असे त्यांनी आवाहन केले.

आपले कारखान्याचा गळीत हंगाम २०२४/२ सुरू असून मतदारसंघातील ऊस गाळपाविना राहणार नाही अशा सूचना शेती विभागात दिलेले आहेत तसेच पुढील वर्षी उद्दिष्ट वीस लाख मीटर उद्दिष्ट सुरू आहे.

आमदार होण्यासाठी ज्ञात अज्ञात शेतकरी सभासद संचालक कर्मचारी, सर्व संतांची संचालक नकारणी दिला यांचे शतशः आभार आहे वहिनी दिलेल्या संधीचे सोने करीन असे त्यांनी शेवटी सांगितले.

सदर प्रसंगी कारखान्याची संचालक प्रा मस्के सर यांना नानांना फाउंडेशन बीड आयोजित वकृत्व स्पर्धेमध्ये त्यांना राजश्री द्वितीय क्रमांक मिळाल्याबद्दल त्यांचाही सत्कार करण्यात आला. सदर कार्यक्रमाची प्रस्ताविक कारखान्याची जनरल मॅनेजर डि.आर. गायकवाड यांनी केली तसेच संचालक तुकाराम मस्के, कार्यकारी संचालक आर बी पाटील, महादेव तळेकर, संजय पाटील सर यांनी मनोगत व्यक्त केले. कारखान्याचे लिगल ऑफिसर व कारखान्याची संजय घुले यांनी उपस्थित यांचे आभार मानले.

सदर कार्यक्रमाप्रसंगी संचालक संभाजी भोसले कालिदास चव्हाण दिनकर चव्हाण, सुरेश भुसे हाके, धनंजय काळे साहेबराव नागणे, कालिदास साळुंखे, जनक भोसले, सचिन सपाटे, कालिदास रणदिवे, तज्ञ संचालक दशरथ जाधव अशोक तोंडले, मंत्री संचालक सचिन पाटील, तानाजी खरात उमेश मोरे, तानाजी बागल, अशोक गाजरे, समाधान ननवरे, इमेज बँकेचे एम एस अधिकारी पी एस पाटील तसेच कर्मचारी हितचिंतक सभासद शेतकरी सर्व मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# इंदापूरच्या आश्रमशाळेत आयोजित आठवडे बाजाराला उत्स्फूर्त प्रतिसाद



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापुर प्रतिनिधी : अतुल सोनकांबळे

इंदापूर/बातमीदार : खरेदी-विक्रीतून मुलांना पैशांची देवाणघेवाण याचे व्यावहारिक ज्ञान व्हावे, यासाठी इंदापूर येथील मातोश्री रमाबाई आंबेडकर विद्यार्थी वसतिगृह ट्रस्ट संचलित प्राथमिक,माध्यमिक, उच्चमाध्यमिक आश्रमशाळा यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ.बाबासाहेब आंबेडकर शैक्षणिक संकुलात आठवडे बाजाराचे शनिवारी (दि.२८) आयोजन केले होते.

शैक्षणिक संकुलात भरलेल्या या बाजाराचे उद्घाटन संस्थेच्या अध्यक्षा शकुंतला मखरे यांच्या हस्ते करण्यात आले.

विद्यार्थ्यांनी विक्रीसाठी आणलेला शेतीमाल पालकांमधील जाणकार ग्राहकांनी उत्स्फूर्तपणे खरेदी केला.

विद्यार्थ्यांनी पालेभाज्या, फळभाज्या, कडधान्य, फळे, खाद्य पदार्थ आदी विक्रीस ठेवले होते. सकाळी ९:३० ते १२ वा. या वेळेत हा बाजार खुला ठेवण्यात आला होता. बाजारातून ग्राहकांनी वस्तूचे मोलभाव करत घेतल्याने विक्रेत्या विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद द्विगुणित झाला होता. बाजारास सचिव ॲड.समीर मखरे, संचालक अस्मिता मखरे आदींनी भेट दिली. त्यांनी रोख पैसे देऊन बाजारातील सामान खरेदी केले. त्यामुळे सहभागी विक्रेते विद्यार्थी भारावून गेले होते. या अनोख्या उपक्रमाचे अध्यक्षा शकुंतला मखरे यांनी कौतुक केले. मुख्याध्यापक साहेबराव पवार, प्राचार्या अनिता साळवे यांनी विक्रेते, ग्राहक, पालक व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले.

**खरेदी-विक्रीतून विद्यार्थांना व्यावहारिक ज्ञान**

खरेदी-विक्री कशी केली जाते, पैशांची देवाण-घेवाण कशी करावी, याबाबत विद्यार्थ्यांना व्यावहारिक ज्ञान असणे आवश्यक आहे. त्यामुळे मुलांचे गणित पक्के होते, असे संस्थेचे सचिव ॲड.समीर मखरे यांनी सांगितले.



# श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर कर्मचाऱ्यांच्या सहकारी पतसंस्थेच्या चेअरमनपदी पावले तर व्हाईस चेअरमनपदी कोळी यांची बिनविरोध निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर कर्मचाऱ्यांचे सहकारी पतसंस्थेच्या चेअरमनपदी बलभीम राजाराम पावले, व्हाईट चेअरमन पदी चंद्रकांत धर्मांना कोळी, यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

पतसंस्थेच्या तत्कालीन चेअरमन पृथ्वीराज राऊत व व्हाईस चेअरमन पांडुरंग कोल्हे यांनी वैयक्तिक कारणास्तव राजीनामा दिल्याने सदरची निवड प्रक्रिया घेण्यात आली रविवार दिनांक २९ डिसेंबर रोजी पतसंस्थेच्या दर्शनी मंडप येथील कार्यालयात निवडणूक प्रक्रिया पार पाडण्यात आली, त्यासाठी खाद्याची अधिकारी म्हणून सहाय्यक निबंधक सहकारी पतसंस्थेचे बीपी सावंत यांनी कामकाज पाहिले व चेअरमन वाई चेअरमन पदासाठी एकच अर्ज आल्याने सदरची निवड प्रक्रिया बिनविरोध पार पडली.

यावेळी पतसंस्थेची संचालक विनोद पाटील, पृथ्वीराज राऊत, पांडुरंग कोले, पांडुरंग बुरांडे, सुनंदा देवकते, बलभीम पावले चंद्रकांत कोळी नारायण देवकुळे राजेंद्र सुभेदार मंदा मिसाळ तुकाराम कुलकर्णी सविता रणदिवे सचिव सुशील कुमार ढेकळे पाटील लिपिक सुरज तेली उपस्थित होते.

नवनिर्वाचित चेअरमन वाई चेअरमन यांचे मंदिर समितीचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी अभिनंदन केले व दिलेली जबाबदारी प्रामाणिकपणे व सेवाभावी उत्तीर्ण पार पाडे नाशिक वही चेअरमन व व्हॉइस चेअरमन यांनी दिली.

# महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई, संघाच्या नूतन शहराध्यक्षपदी मोरे तर तालुकाध्यक्षपदी कोळी यांची बिनविरोध निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई संघाची पंढरपूर येथे रविवारी दिनांक २९/१२/२०२४ रोजी जैतून बी महाराज मठामध्ये पदवी पदाधिकाऱ्यांच्या निवडी संपन्न यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष राजेंद्र कोरके पाटील हे अध्यक्षस्थानी होते.

यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई संघाच्या पंढरपूरची तालुकाध्यक्षपदी साप्ताहिक हंबर्डाचे संपादक रवींद्र कोळी, व पंढरपूर शहराध्यक्षपदी पंढरपूर माझा न्युज ची संपादक संतोष मोरे यांची निवड केली.

यावेळी नूतन अध्यक्षांनी संघाच्या माध्यमातून गोरगरीब सर्वसामान्य जनतेच्या देण्यासाठी संघाच्या वतीने प्रामाणिक प्रयत्न करणार असल्याने सांगून पत्रकारांच्या समस्या शासन दरबारी मांडणार असल्याचे आश्वासनही दिले.

तसेच यावेळी पंढरपूर संघाचे माजी तालुकाध्यक्ष रामदास नागटिळक यांनी संघाच्या कार्याचा थोडक्यात आढावा देऊन आपले मनोगत व्यक्त केले.




नूतन पंढरपूर शहराध्यक्ष संतोष मोरे तर तालुकाध्यक्ष रवींद्र कोळी यांचा सत्कार ह.भ.प. राजेश बदले पाटील यांच्या हस्ते नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी संघाचे सदस्य नागेशादापुरे, सचिन कुलकर्णी, शंकर कदम, विक्रम कदम, दादा कदम, मनोज पवार, संजय यादव, प्रमोद भोसले, संजय ननवरे, धनाजी राक्षे, मनोज पवार, लक्ष्मण शिंदे, राजेंद्र करपे, सुनील कोरके, बाळासाहेब काशीद , कुमार कोरे, रोहन नरसाळे इत्यादी पत्रकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अनेक ठराव,अहवाल नामदेव क्षत्रिय महासंघाच्या राज्यस्तरीय बैठकीत एकमुखाने मंजूर

**उपस्थित पदाधिकाऱ्यांचा सन्मान**

# पंढरीतील संत नामदेव स्मारक जन्मस्थळ जीर्णोद्धारासाठी पाठपुरावा करणार : प्रदेशाध्यक्ष ॲड. महेश ढवळे



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : तीर्थक्षेत्र पंढरपूर येथे शासनाने मंजूर केलेल्या १५ कोटीच्या संत शिरोमणी नामदेव महाराज स्मारकाचे काम लवकरच सुरू करण्यात यावे २०२५ मध्ये संत नामदेव महाराज ६७५ वा संजीवन समाधी सोहळा महाराजांच्या ६७५ वा संजीवन समाधी सोहळा पंढरपूर येथे भव्य दिव्य स्वरूपात साजरा करण्यात तसेच श्री केशवराव संस्थेच्या संत नामदेव महाराज जन्म स्थान असलेल्या प्रदक्षिणा रोडवरील संत नामदेव महाराजांचा जन्मोतदार करणे यासह अनेक ठराव अहवाल नामदेव क्षत्रिय महासंघाच्या राज्यस्तरीय बैठकीत एकमुखाने मंजूर करण्यात आला असल्याची माहिती प्रदेशाध्यक्ष अँड महेश ढवळे यांनी दिली. येथील संत नामदेव मंदिर येथे शुक्रवारी दिनांक २७ रोजी अखिल भारतीय नामदेव क्षत्रिय महासंघाचे बैठक प्रदेशाध्यक्ष अँड महेश ढवळे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. त्यावेळी ते बोलत होते. प्रारंभी श्री केशवराज भोसरी नामदेव महाराजांचे पूजन करण्यात आले. माजी पंतप्रधान डॉक्टर मनमोहन सिंग समाजाची म्हात्रे अनंत पतंगे यांच्यासह मळ्यात समाज बांधव मान्यवरांचा श्रद्धांजली वाहण्यात आली व बैठकीमध्ये विविध विषयावर चर्चा करण्यात सर्व ठराव एकमुखाने हात वर करून मंजूर करण्यात आले व शिंपी समाजाच्या आर्थिक उन्नतीसाठी राज्य शासनाने संत नामदेव महाराज आर्थिक विकास महामंडळाची स्थापना केली आहे यासाठी अँड महेश ढवळे यांनी घेतलेल्या प्रश्नाचा यश आल्यामुळे यावेळी त्यांच्या अभिनंदन ठराव करण्यात आला. यावेळी श्री केशवराज संस्था समस्त शिंपी समाज पंढरपूर यांच्या वतीने उपस्थित पदाधिकाऱ्यांच्या येतोच सन्मानित करण्यात आला.

यावेळी बोलताना प्रदेशाध्यक्ष अँड महेश ढवळे मनाली की संत नामदेव महाराज आर्थिक विकास महामंडळ हे राज्य शासनाने शिंपी समाजाच्या आर्थिक उन्नतीसाठी मंजूर केले आहे यासाठी काय करावे लागते याबाबत मार्गदर्शन करून सदर योजनेची शिंपी समाजातील विविध पोट जमातीमधील गरजू लोकांना लाभ घेण्याची तसेच शिंपी समाजातील सर्व पौडदातीमधील नागरिकांनी समाजाच्या उन्नतीसाठी एकत्र येण्याची आव्हान केले संत नामदेव महाराज आर्थिक विकास महामंडळ योजना त्याचे संत नामदेव महाराज स्मारकाची उभारणी संत नामदेव मंदिरात जीर्णोद्धार करण्यासाठी तसेच सर्वांगीण प्रसंगतीसाठी आपण शासन स्तरावर पाठपुरावा करणार त्यासाठी कटिबद्ध असल्याची त्यांनी सांगितली.

सदर बैठकीमध्ये अनेक विषयावर चर्चा करण्यात आली यामध्ये प्रामुख्याने गेल्या अनेक वर्षापासून प्रलंबित असलेल्या व राज्य शासनाने १५ कोटी रुपये मंजूर केलेल्या संत नामदेव महाराजांची स्मारक वसंत नामदेव महाराजांचे जन्मस्थान असलेल्या मंदिराचा जीर्णोद्धार करणे या विषयावर सविस्तर चर्चा होऊन मार्ग मोकळा करण्याचा निर्णय घेतला लवकरच भारतातील सर्वात मोठे संत नामदेव महाराजांचे स्मारक वसंत नामदेव महाराजांची मंदिर उभारण्याच्या संकल्प याप्रसंगी करण्यात आला प्रदेशाध्यक्ष अँड महेश ढवळे केशवराव संस्थेचे सर्वेसर्वा रुपेश खांडके नामदेव समाज उन्नती परिषदेचे अध्यक्ष संजय नेवासकर व पंढरपूर शिंपी समाजाचे पदाधिकारी खेळीमेळीच्या वातावरणात या महत्त्वपूर्ण विषयावर सर्वांमध्ये मंजुरी दिली वसंत नामदेव महाराज मंदिराच्या जबाबदारासाठी समाजातील दानशूर व्यक्तींनी सरळ हाताने देणगी देण्याचे जाहीर केले व पुढील वर्षी जुलै महिन्यात सण नामदेव महाराजांचा ६७५ व्या संजीवन समाधी सोहळ्याचे आयोजन भव्य दिव्य प्रमाणात करण्याची ठरविण्यात आले आहे अँड महेश ढवळे यांच्या नेतृत्व विश्वास ठेवून महाराष्ट्रात समस्त शिंपी समाज एकत्र करण्यात निर्णय घेण्यात आला

यावेळी राष्ट्रीय अध्यक्ष नानासाहेब पाथरकर, संत नामदेव महाराज वंशज ह भ प माधव महाराज नामदास, मुकुंद महाराज नामदास, नसापाचे अध्यक्ष संजय नेवासकर, पंढरपूर शिंपी समाज अध्यक्ष गणेश होंडाळे जिल्हाध्यक्ष राजेश धोपटे , केशवराज संस्थेचे विश्वस्त औदुंबर निघते माझे अध्यक्ष ज्ञानेश्वर भालेकर गुरुजी प्रदेश पदाधिकारी महादेव खटावकर डॉक्टर अजय सल्लागार प्रज्ञा सल्लागार मुंबई प्रदेशाध्यक्ष अशोक खैरनार संतोष मुळे मनोज भंडारकर नंदकुमार कोसास्वार अनिल गचके प्रभाकर नानोटे महेश मुरलीधर रेडेकर अरुण होमकर संतोष मानसुरकर विलासपुरी महेश गांगोटी संजय कांबळे संजय चांडोली दत्तप्रसाद निपाणीकर छायाचित्रकार किशोर काकडे प्रशांत काकडे पत्रकार प्रशांत माळवदे भिकाजीराव गंभवले प्रदेश महिला अध्यक्ष रेखाताई मुतखर युवक अध्यक्ष अँड सिद्धार्थ भांबोरे अकलूजचे विजय देवळे दिनकर चांडोले युवक संघटनेचे अध्यक्ष शैलेश धट, दत्तात्रय चांडोली रत्नाकर पिसे यासह महाराष्ट्रातील एकूण २७ जिल्ह्यातील जिल्ह्याचे तालुका अध्यक्ष व प्रदेश पदाधिकारी पुरुष व युवक महिला वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

## थोडक्यात...

### अज्ञात चोरट्याने दुचाकी पळवली

सोलापूर, (प्रतिनिधी) : दुचाकी क्रमांक एमएच.१३.सीवाय.६२०२ ही अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना २२ डिसेंबर रोजी महापालिका शाळा क्रमांक चार उत्कर्ष नगर विजापूर रोड सोलापूर येथे घडली. याप्रकरणी राकेश किसन बडवणे




(वय-३४,रा. उत्कर्ष नगर, विजापूर रोड) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल हार हे करीत आहेत.

# ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनासाठी मार्मिक कवितेची निवड

## वास्तवकार देवभाऊ उबाळे दिल्लीत मांडणार गावाचे गाऱ्हाणं

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : सरहद पुणे आयोजित अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे नवी दिल्ली येथे तीन दिवसीय संपन्न होत आहे. या ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनासाठी मुंबई विभागातून साहित्यिक कवी लेखक वास्तवकार देवभाऊ उबाळे यांच्या स्वलिखीत ऋमुक्काम पोस्ट कसारा - सुंदर माझं गांव? या अतिशय मार्मिक कवितेची निवड झालेली आहे. सर्वसामान्य कुटुंबात जन्मलेल्या कवीच्या कवितेची निवड झाल्याचे त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. या निमित्ताने दिग्गज साहित्यिकांच्या पंक्तीत देवभाऊ उबाळे यांना काव्य वाचन करून काव्य विचाराच्या माध्यमातून दिल्लीच्या दरबारी आपल्या गावाचे गाऱ्हाणं मांडता येणार आहे. कसारा सारख्या उपेक्षित वस्तीतून दिल्ली सारख्या ठिकाणी मार्मिक कवितेची निवड करण्यात आली असल्याकारणाने उबाळेंवर सर्व स्तरातून शुभेच्छांचा वर्षाव होत असून, ही समस्थ शहापूर तालुक्यातील कसारा वाशियांसाठी गौरवास्पद बाब आहे.

मायमराठीला अभिजात भाषेचा दर्जा देण्याचा ऐतिहासिक निर्णय झाल्यानंतर प्रथमच मायमराठीचा जागर करण्यासाठी ९८ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन दिल्ली येथे होत आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेनंतर पहिल्यांदा आणि ७० वर्षानंतर दुसऱ्यांदा दिल्लीत होणारे हे संमेलन ऐतिहासिक तालकटोरा स्टेडीयम येथे होणार आहे.

जगातील चौदा कोटी लोकांची मराठी ही जगातील नवव्या क्रमांकाची भाषा असून मायमराठीचा जागर करण्यासाठी आणि तिचे ऋण व्यक्त करण्यासाठी वास्तवकार देवभाऊ उबाळे आपल्या काव्य विचाराच्या माध्यमातून गावाचा महिमा उलगडणार आहेत. दिल्ली येथील हे संमेलन दि. २१ फेब्रुवारी ते २३ फेब्रुवारी दरम्यान होणार असून संमेलनात ग्रंथ दिंडीसह ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन करून निमंत्रितांचे कविसंमेलन होणार आहे.

संमेलनासाठी उद्घाटक देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी, स्वागताध्यक्ष शरद पवार, नियोजित संमेलनाध्यक्ष डॉ. तारा भवाळकर, अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ मुंबईच्या अध्यक्षा प्रा. उषा तांबे, कर्नाटक राज्याचे उपाध्यक्ष गुरय्या रे स्वामी, कार्यवाह उज्ज्वला मेहंदळे, कोषाध्यक्ष प्रकाश पागेसह सरहदचे संस्थापक अध्यक्ष संजय नहार आदी उपस्थित राहणार आहेत.





## कॅनव्हास इंटरनॅशनल स्मार्ट स्कूल मधील विद्यार्थ्यांनी तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात पटकावला दुसरा क्रमांक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/सुधाकर रणदिवे : कॅनव्हास इंटरनॅशनल स्मार्ट स्कूलच्या विद्यार्थ्यांनी अलीकडेच शिराढोण येथे झालेल्या तालुका स्तरीय विज्ञान प्रदर्शनात दुसरा क्रमांक पटकावून शाळेचे नाव उज्वल केले. अनेक शाळांशी स्पर्धा करताना कॅनव्हासच्या विद्यार्थ्यांनी नैसर्गिक शेती या विषयावर सादर केलेल्या प्रकल्पाला नाविन्यपूर्ण दृष्टिकोनामुळे विशेष कौतुक मिळाले, या प्रकल्पात आधुनिक व पर्यावरणपूरक शेती तंत्राचा समावेश होता. ज्यामध्ये हायड्रोपोनिक शेती, व्हर्टीकल फार्मिंग शेती, रेन वॉटर हार्वेस्टिंग, शेणखताचा उपयोग आणि सौर ऊर्जा वापरून शेती यांचा उल्लेख होता. विद्यार्थ्यांनी या तंत्राची सखोल संशोधन व सर्जनशील सादरीकरणातून शेतकऱ्यांसाठी उपयुक्त उपाय सादर केले. त्यांच्या उत्कृष्ट सादरीकरणामुळे परीक्षकांनी शाबासकी आणि शाश्वत शेतीच्या प्रक्रियेतील योगदानासाठी भरभरून प्रशंशा मिळवली शाळेचे विज्ञान शिक्षक अमोल सांजेकर यांच्या मार्गदर्शनाखाली कु. धनश्री पवार हिने हा प्रकल्प विकसित केला. त्यांनी आधुनिक शेतीचे आव्हाने ओळखून पर्यावरण स्नेही उपाय शोधले. त्यांच्या साजरी करणात सखोल ज्ञान नाविन्यपूर्ण उपाय आणि आजच्या शेतीच्या गरजांसाठी लागणारे मुद्दे प्रभावीपणे मांडले. यावेळी आर. व्ही. चकोर (गट विकास अधिकारी वर्ग १) डी.एम काळमते (गटशिक्षणाधिकारी) एस एस माळी विभाग प्रमुख तथा विस्तार अधिकारी पंचायत समिती कळंब यांनी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन त्यांचे कौतुक केले. कॅनव्हास इंटरनॅशनल स्मार्ट स्कूलचे संस्थापक रवी नरहिरे यांनी या यशाबद्दल विद्यार्थ्यांचे कौतुक करताना सांगितले. ही कामगिरी आमच्या विद्यार्थ्यांच्या आणि शिक्षकांच्या समर्पण, नावीन्यता आणि एकत्रित प्रयत्नांचे धोतक आहे. त्यांच्या यशामुळे आम्हाला वर्गाच्या बाहेर विचार करण्याची प्रेरणा मिळते. आणि खऱ्या जगाच्या आव्हानांना उत्तर देण्याची क्षमता निर्माण होते. संपूर्ण कॅनव्हास कुटुंब या उल्लेखनीय यशाचा आनंद साजरा करत आहे आणि विद्यार्थ्यांच्या कष्ट व यशाबद्दल अभिनंदन करत आहे. शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवणारी असून इतरांना विज्ञान व शाश्वतेच्या नाविन्यपूर्ण वाटावर विचार करण्यासाठी प्रोत्साहन देते.

# पुरंदर किल्ले परिसरात ३१ डिसेंबरला प्रवेश बंदी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुरंदर/प्रतिनिधी : पुरंदर : छत्रपती संभाजीमहाराज यांचे जन्म स्थळ असलेल्या पुरंदर किल्ले परिसरात मद्य पान करणाऱ्या संद र्भात सरकारने कठोर पाऊल उचलले आहे.

मंगळवार ता. ३१ डिसेंबर किल्ले पुरंदर परिसरात प्रवेश करण्यास बंदी करण्यात आली आहे. अशी सूचना सुरक्षा अधिकारी सेना प्रशिक्षण केंद्र पुरंदर, यांनी केल्याची माहिती सासवड पोलीस स्टेशन चे पोलीस निरीक्षक ऋषिकेश अधिकारी यांनी दिली.पुरंदर किल्ल्यावर निसर्ग प्रेमीची गर्दी सुट्टी च्या दिवशी जास्त असते.

पर्यटकांचा आनंद द्विगुणित करणाऱ्या किल्ल्यावरील पर्यटनास ३१ डिसेंबरला बंदी घालण्यात आली आहे. वर्षाच्या शेवटच्या दिवसाचा आनंद लुटण्यासाठी पर्यटक मोठया प्रमाणात घराबाहेर पडतात, पर्यटकांची गर्दी वाढून निसर्ग संपतीला कोणतीही हानी पोहचू नये, यासाठी पुरंदर किल्ला परिसरात प्रवेश बंदी करण्यात आली आहे.

या काळात किल्ले परिसरात बेकायदेशीर कृत्य करणारे आढळून आल्यास त्यांचेवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल. अशा सक्त सूचना सासवड पोलीस स्टेशन चे पोलीस निरीक्षक ऋषिकेश अधिकारी यांनी दिल्या.



## स्वा. सावरकर विद्यालय कोठुरेचे ५२ व्या निफाड तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात यश



निफाड/प्रतिनिधी : मराठा विद्या प्रसारकसमाजाचे,स्वातंत्र्यवीरसावरकर विद्यालय ,कोठुरे या विद्यालयाने ५२ व्या निफाड तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात सक्रिय सहभाग घेतला. हे विज्ञान प्रदर्शन कर्मवीर भाऊराव पाटील माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, विंचूर येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाले. विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळावा व त्यामध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजावा यासाठी हे विज्ञान प्रदर्शन आयोजित केले जाते. या विज्ञान प्रदर्शनाच्या बक्षीस वितरणासाठी शिक्षक आ. किशोर दराडे तसेच दिंडोरी लोकसभेचे खा. भास्करराव भगरे उपस्थित होते. या स्पर्धेत स्वातंत्र्यवीर सावरकर विद्यालयाला (माध्यमिक गटात) कु.नंदन दिघे व वैभव मोगल यांचे उपकरणास तृतीय क्रमांक मिळाला. या विद्यार्थ्यांना विज्ञान- गणित शिक्षक कुटे अर्चना, रोशन दवते, सुरेखा झोमान, अनिता पवार मॅडम, प्रियंका आव्हाड यांचे मार्गदर्शन लाभले. मविप्र संस्थेचे सरचिटणीस नितीन भाऊ ठाकरे, संस्थेचे अध्यक्ष. सुनील जी ढिकले, उपाध्यक्ष विश्वासरावजी मोरे, मविप्र सभापती तथा स्वातंत्र्यवीर सावरकर विद्यालय, कोठुरे शालेय समिती अध्यक्ष बाळासाहेब क्षीरसागर, निफाड तालुका संचालक शिवाजी गडाख, महिला संचालक सौ. शोभा भागवत बोरस्ते, मविप्र शिक्षण संस्थेचे शिक्षणाधिकारी भास्करराव ढोके, नितीन जाधव तसेच शालेय समितीचे सुयोग भाऊ गीते. तुषार भाऊ मोगल व सर्व सदस्य या सर्वांनी विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे अभिनंदन केले.

यावेळी मुख्याध्यापक शिवाजीराव सानप, ज्येष्ठ शिक्षक नितीन सावकार. लहनु शिंदे, संजय निकम, निकम सुधाकर, किरण भडांगे, सुनिता दाणी, माधव गाडे, पवळे विजय, चितळकर मॅडम, जाधव गायत्री, विठ्ठल खोकले, दत्तात्रय दराडे, शिवाजी पोटे, राजेंद्र पवार, मनोज मोगल आदी उपस्थित होते.

## श्री क्षेत्र कानिफनाथ गडावर दिनदर्शिकेचे प्रकाशन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुरंदर/प्रतिनिधी : श्री क्षेत्र कानिफनाथ गडावर नवनाथ देवस्थान पंचायत कमिटी ट्रस्ट व समस्थ ग्रामस्थ बोपगांव यांच्या वतीने तयार केलेल्या दीनदर्शीकेचे मा. विजय बापू शिवतारे ( आमदार पुरंदर - हवेली ) (मा.जलसंपदा व जलसंधारण राज्य मंत्री महाराष्ट्र राज्य ) यांचे हस्ते करण्यात आले.

सदर दिनदर्शिके मध्ये कानिफनाथ गडावर वर्ष भरात साजरे होणारे उत्सव याची अचूक माहिती तशेच वर्ष भरातील सन, शुभ दिवस याची माहिती आपणास दिनदर्शिके पाहायला मिळेल.

आमदार पदी निवड झालेनंतर मा. विजय बापू शिवतारे पहिल्यांदा कानिफनाथ गडावर आल्यामुळे समस्त ग्रामस्थ बोपगांव व नवनाथ देवस्थान पंचायत कमिटी ट्रस्ट च्या सर्व संचालक मंडळाच्या वतीने स्वागत करण्यात आले व सन्मान करण्यात आला.



संचालक मंडळ व भाविक मोठया संख्येने उपस्थित होते.

## पंचरत्न मित्र मंडळ चेंबूरतर्फे वार्षिक दिनदर्शिकेचे प्रकाशन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई उपनगर (केतन भोज) : समाजात विविध क्षेत्रांत लोक कल्याणार्थ कार्यरत असलेल्या सेवाभावी संस्था आहेत.या संघटना एका विशिष्ट हेतूने काम करते यातील स्वयंसेवक स्वेच्छेने व निःस्वार्थीपणे कोणतेही काम व मदत करण्यास तत्पर असतात.या संघटना प्रामुख्याने नैसर्गिक आपत्तींत सापडलेल्यांना अनेक प्रकारे साहाय्य करतात. अन्नधान्य, कपडे, गृहोपयोगी वस्तू , औषधे, वह्या पुस्तके अशा विविध अंगांनी मदतही देतात. यांशिवाय



लोकांना मूलभूत हक्कांची जाणीव करून देणे, नागरी सुविधांबद्दल जागरूक करणे, बेरोजगारांना रोजगार मिळवून देण्यास साहाय्य करणेतसेच अन्य अनेक समस्यांची सोडवणूक करण्यासाठी सहकार्य करण्याचे काम पंचरत्न मित्र मंडळ गेली अनेक वर्षे निस्वार्थी पणे करीत आहे.समाजाचे ऋण फेडण्यासाठी सतत अनेक वर्ष कार्यरत असलेल्या आर. सी.एफ कर्मचारी वर्गाच्या पंचरत्न मित्र मंडळ (रजि.) चेंबुरतर्फे अध्यक्ष अशोक भोईर, सचिव प्रदीप गावंड खजिनदार सचिन साळूंखे, उपाध्यक्ष रमेश पाटील, सहसचिव वैभव घरत, सल्लागार हनुमंता चव्हाण, सर्व महिला-पुरुष कार्यकर्ते यांच्या प्रयत्नाने अनेक समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात येतात.

पंचरत्न मित्र मंडळ (रजि.)चेंबूर तर्फे मंडळाच्या वार्षिक दिनदर्शिकेचे प्रकाशन आरसीएफचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक सन्मा. श्री.श्रीनिवास मुडगेरीकरसाहेब यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी आरसीएफच्या वित्त संचालक श्रीमती.नजहत शेख मॅडम तसेच संचालक टेक्निकल सौ.रितू गोस्वामी मॅडम उपस्थित होत्या.या कार्यक्रमासाठी पंचरत्न मित्र मंडळाचे अध्यक्ष श्री.अशोक भोईर, सचिव श्री.प्रदिप गावंड तसेच मंडळाचे बहुसंख्य पदाधिकारी उपस्थित होते. सी.एम.डी साहेबांनी मंडळाच्या कार्याचे कौतुक करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.सचिन साळुखे, रमेश वामन पाटील, डॉ. रजनीशकुमार, वैभव घरत, प्रकाश शेजवळ, संतोष नाईक, मंदार भोपी, सुशील मिस्त्री, रूपाली नांदिवडेकर, राजश्री कदम सचिन राखाडे यांनी या कार्यक्रमासाठी विशेष परिश्रम घेतले.

### सरसेनानी आनंदराज आंबेडकर या बौद्ध धम्म परिषदेला उपस्थित राहणार

### १२ जानेवारी रोजी पुज्य भदन्त उपगुप्त महाथेरो व भदन्त धम्मसार थेरो यांची होणार धम्मदेसना

# किल्लारी गावात चौथी विशाल बौध्द धम्म परिषद; भिमगितांचा भरगच्च कार्यक्रम



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे : महाकरुणीक तथागत भगवान गौतम बुद्धांनी लोक कल्याणाचा मार्ग दाखवत बहुजनांच्या हिता साठी व सुखासाठी धम्माचा उपदेश केला बुद्धानी धम्म श्रवण करणे हे मनुष्याला उत्तम जीवन जगण्याची प्रेरणा मिळाली.

प्रत्येकाचे व्यक्तीगत कौटुबिक आणि सामाजिक जिवनात मांगल्य निर्माण करण्याचे कार्य हे धम्म संस्कार करित आहे.

म्हणून किल्लारी गावात येत्या १२ जानेवारी रोजी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू सरसेनानी आनंदराज आंबेडकर हे उपस्थित राहाणार आसुन पुज्य भदन्त उपगुप्त महाथेरो भदन्त धम्मसार थेरो, भदन्त डॉ यश काश्यपायन भदन्त पय्यातिस्स थेरो, भदन्त महाविरो थेरो, भदन्त पय्यानंद थेरो , भदन्त धम्माशिल थेरो, भदन्त धम्मविरोयो थेरो, भदन्त राजरत्न थेरो, भदन्त नागसेन बोधी थेरो, भदन्त सुमेधनजी नागसेन, भदन्त विनयशिल, भदन्त सुमंगल, भदन्त संघानंद भदन्त धम्मदिप, भदन्त धम्मप्रिय

भदन्त बुद्धशिल, भदन्त. बोधीराज, भदन्त संघानंद, भदन्त अमरज्योती, भदन्त धम्म बोधी पुज्य भन्ते यांच्या उपस्थित होणार आसुन धम्मपरिषदेचे स्वागताध्यक्ष किल्लारी गावचे उप सरपंच युवरात हरिचंद्र गायकवाड हे राहाणार आहेत

तर औशाचे लोकप्रिय आमदार अभिमन्यू पवार, चंद्रकांत कांबळे सह अनेक राज्यातील प्रमुख मान्यवर उपस्थित राहणार आहेत . याच ठिकाणी भिमगीतांचा जंगी कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे तरी या दिनांक १२ जानेवारीला चौथी बौद्धधम्म परिषदेला आंबेडकर प्रेमी बौद्ध उपासक आणि उपासिकानी हजारोच्या संख्येने उपस्थित रहावे आसे अवहान आयोजक भदन्त धम्म सार थेरो यानी केला आहे.